# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

**प्रेस नोट क्र-६९** **दिनांक - २९/०२/२०२४**

**अल्पवयीन मुलीवर लैंगिक हमला करणा-या आरोपींना मा.न्यायालयाने सुनावली शिक्षा**

मिरा-भाईंदर,वसई विरार पोलीस आयुक्तालयातील नयानगर पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर I ४१९/२०१९, भा.दं.वि.सं.कलम ३७६,३५४ अ, पोक्सो कायदा कलम ८, १२ मधील आरोपीत नामे १) डेनिस थॉमस लुईस वय- ६३ वर्ष रा.बिल्डींग नं रामदेव पार्क मिरारोड पुर्व २) जेणेविया अनिल मथाईस वय ३२ वर्षे यांना अनुक्रमे दिनांक १४/१२/२०१९ रोजी व दिनांक २१/१२/२०१९ रोजी वा अटक करण्यात आली होती.

गुन्हयातील आरोपीत क्र. ०१ हा अटक केल्यापासुन जेलमध्ये होता. सदर केसची सुनावणी दरम्यान दिनांक २८.०२.२०२४ रोजी मा.न्यायाधीश श्री.डी.एस.देशमुख यांनी यातील आरोपीत क्र.०१ यास दोषी ठरवुन त्यास ०५ वर्षे सश्रम कारावास व ५०००/रु दंड व दंड न भरल्यास ०१ महिना साधा कारावास अशी शिक्षा तर आरोपीत क्र.०२ हिस ०८ महिने साधा कारावास व ५०००/रु दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर केसचा तपास पोलीस निरीक्षक कैलास बर्वे तात्कालिन नेमणुक नयानगर पोलीस ठाणे यांनी केला असुन सदर केसच्या सुनावणी दरम्यान सरकारी अभियोक्ता श्रीमती संध्या म्हात्रे व श्री विवेक कडु यांनी कामकाज पाहिले. सदरची केस चालु असताना प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -०१, राजेंद्र मोकाशी सहा पोलीस आयुक्त,नवघर विभाग, विलास सुपे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले.

**----0000----**